पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६६**

(सभावृत्तांत)

दिनांक – ०६/०६/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०६/०६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी
१६. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१), मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.तुपे, मा.पठाण - सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोराटे, मा.झगडे, मा.राऊत, मा.चितळे, मा.कापडणीस - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ),

मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.पवार, मा.विशाल कांबळे, - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.जाधव, मा.मुथा – प्रशा.अधिकारी, मा.चारटणकर - सहव्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२०) वृक्षारोपणासाठी मोठी रोपे पुरविणे व लागवड करुन १ वर्ष देखभाल करणे.

विषय क्र.२१) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी २ मीटर उंचीची वृक्षारोपणाची मोठी रोपे खरेदी करणे.

विषय क्र.२२) ब प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे.

विषय क्र.२३) पिंपरी चिंचवड दर्शन बस सेवेकरीता १० वातानुकुलित बसेस (बीआरटीसाठी) खरेदी करुन मिळणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) ८ ही क्षेत्रीय कार्यालयामध्ये जलनि:सारण विभागाकडून सुचना फलक लावणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२५) ८ ही क्षेत्रीय कार्यालयामध्ये जलनि:सारण विभागाकडून सुचना फलक लावणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२६) चोविसावाडी शाळा व यशवंतनगर शाळेतील विद्यार्थी वाहतुकीसाठी मे.प्रेम टुर्स ॲन्ड ट्रॅव्हलर्स यांना थेट पध्दतीने मंजूर दराने काम देणेबाबत – मा.विकास डोळस, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव.

---------

अ) दिनांक २३/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ)मा.राजेंद्र गावडे – मा.स्थायी समिती सभा क्र.६५, दि.३०/०५/२०१८ मधील दाखल विषयांमध्ये विषय क्र.३४ “ मा.स्थायी समिती ठराव क्र.२७०७ दि.२३/०५/२०१८ मध्ये दुरस्तीबाबत ” या प्रमाणे विषय दाखल करुन घेणेचे दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत यावा

मा.सभापती - मा.स्थायी समिती सभा क्र.६५, दि.३०/०५/२०१८ मधील दाखल विषयांमध्ये विषय क्र.३४ “मा.स्थायी समिती ठराव क्र.२७०७ दि.२३/०५/२०१८ मध्ये दुरस्तीबाबत” या प्रमाणे विषय दाखल करुन घेणेचे दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - २७४५ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/शअ/तां/४/९२/२०१८ दि.०९/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी संस्थेंकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहिन्या नगरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाई परवानगी महापालिकेमार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरुन घेण्यात येतो. सद्य:स्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्तीखर्च अंदाजे सरासरी र.रु.६,५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३,०००/- असे प्रती मी. प्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/ निमशासकीय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृटीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते.

**<u>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मागणी-</u>**

कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. यांचे कडील पत्र क्र.उ.अ./स्था/IFMSA0664/2018 दि.४/१/२०१८ पत्राचे अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रामध्ये कार्यकारी अभियंता, मऔविम यांनी पिं.चिं. औद्योगिक क्षेत्रातील जुन्या जलवाहिन्या बदलण्या संदर्भात परवानगी विषयी दि.२०/१२/२०१७ च्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेणेकामी विनंती केली होती. तरी अद्यापपावेतो पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे या सर्व साधारण सभेमध्ये काय निर्णय झाला ते अद्याप कळविण्यात आलेले नाही. तरी आपण आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन परवानगी संदर्भात कार्यवाही त्वरीत करावी, जेणे करुन सदरील काम लवकरात लवकर सुरु करता येईल व उद्योजकांतर्फे येणा-या पाण्याच्या तक्रारी दूर करता येतील, असे कळविलेले आहे.

त्यानुषंगाने, इकडील पत्र क्र.स्था/श.अ./तां/४/३२/२०१८ दि.३१/१/२०१८ अन्वये कार्यकारी अभियंता, मऔविम यांना अद्यापपावेतो महानगरपालिकेच्या मा.महापालिका सभेमध्ये पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील जुन्या जलवाहिन्या बदलण्या संदर्भात परवानगीबाबत निर्णय घेण्याबाबतची

कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब सद्य:स्थितीत मनपाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे खोदाईची परवानगी घेऊन कार्यवाही करण्यात येणे बाबत कळविलेले आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडील पत्र क्र.उ.अ./ IFMNS/A56045/2018 दि.१२/२/२०१८ चे अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रान्वये उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी “मऔविम क्षेत्रामधील व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काही जुन्या जलवाहिन्या बदलण्याचे काम चालू करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे रस्ते खोद काम करणेसाठी परवानगी मागितलेली आहे. सदर रस्ते मऔवि महामंडळाचे मालकीचे असून रस्ते दुरुस्ती व देखभखालीसाठी पिंपरी चिंचवड नवनगरपालिकेस हस्तांतरीत करणेत आलेले आहेत. तरी मऔविम क्षेत्रामधील जुन्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रस्ते खोदकाम शुल्क परिगणित करताना मनपा अधिभार लावू नये”, असे कळविलेले आहे**.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यात बाह्य संस्थेंच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदाईस परवानगी देणेसाठी रस्ता पुर्ववत करणेच्या शुल्क व मनपा अधिभार आकारण्या बाबतचे धोरण दि.९/५/२००७ च्या मान्य प्रस्तान्वये निश्चित केलेले आहे. सदरचे धोरण निश्चित करताना “पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये महापालिका रस्ते बांधणे व वेळोवेळी रस्ते सुस्थितीत ठेवणेकामी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करते. अशा रस्त्यावर ब-याचवेळी व्यावसायीक हेतुन केबल लाईन्स/ टेलीफोन लाईन्स/ इलेक्ट्रीक लाईन्स व अन्य सेवा वाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदाईस परवानगी संबंधित संस्था/ कंपनी महापालिकेकडे मागतात. सदर रस्त्यावर केबल/ लाईन्स टाकल्यावर सदर संस्था/ कंपनी यांना त्यातुन मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. सदर संस्था/कंपनी मनपाच्या रस्त्यावर सदर व्यावसायिक व्यवहार करताना नफा कमवितात व मनपा मात्र रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करते. सदर भांडवली खर्च काही प्रमाणात वसूल व्हावा याकरिता अशा संस्था/ कंपनी यांना रस्ता खोदाईस परवानगी देताना मनपा अधिभार लावण्यात यावा. व हा अधिभार खोदाईसह रस्ते पुर्ववत करण्याचे मनपाचे विहीत दरा खेरीज अलाहिदा असावा.”असे सदरच्या प्रस्तावात नमुद आहे.

त्यानुसार, महापालिका क्षेत्रातील रस्त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी वगळून सर्व बाह्य संस्थेंकडून रस्ता पुर्ववत करण्याचे शुल्क व मनपा अधिभार आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत होती.

तथापि- १) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडून तत्कालीन मा.पालकमंत्री व ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे बैठकीतील सुचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांनी र.रू.१५००/- व तदनंतर र.रू.२३००/- प्रती मी. याप्रमाणे एकत्रित शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेचे धोरण निश्चित केले होते. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र .संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि .१८ मार्च २०१६ अन्वये कळविले नुसार “महानगरपालिका नगरपालिका क्षेत्रात भुमिगत विज वाहीनी टाकण्यासाठी नागपुर महानगरपालिका आणि महावितरण यांचेत Road reinstatement बाबत झालेला सामंजस्य कराराचा नमुना समजून त्यानुसार सामंजस्य करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर

करणेबाबत”कळविले आहे. त्यानुसार, दि.२२/१२/२०१७ च्या मा.आयुक्त यांचा मान्य प्रस्ताव, मा. महापालिका सभा ठराव क्र.१३१ दि.०५/०२/२०१८ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे बरोबर महापालिकेने केलेल्या दि.२८/२/२०१८ रोजीच्या सामंजस्य करारा नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी त्याच संस्थेने मनपाने विहीत केलेल्या विनिदेशा प्रमाणे रस्ते दुरूस्त करून पुर्ववत करण्याच्या अटीस अधिन राहून व फक्त र.रू.१००/- प्रति मी. या प्रमाणे पर्यवेक्षण शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्याबाबचे धोरण निश्चित झालेले आहे.

२) महाराष्ट्र शासनाकडील दि.१७/०५/२०१३ च्या पत्रानुसार दि.१/४/२००६ च्या शासन निर्णयानुसार ज्या नेटवर्किंग अभिकर्ता/संस्था (OFC केबल टाकणा-या) शासनाची रितसर परवानगी घेऊन महापालिकेकडे परवानगी मिळणेकामी मागणी करतील अशा अभिकर्ता/संस्थांचे प्रस्तावाबाबत शासन निर्णय दि.१/४/२००६ मध्ये नमुद प्रमाणे सूट देणेबाबत चा आदेश दि.३/७/२०१३ रोजी पारीत झालेला आहे. त्यानुसार सदर आदेशाच्या दिनांका पासून ज्या नेटवर्किंग कंपन्या शासनाची परवानगी घेऊन रस्ता खोदाईसाठी अर्ज करतील अशा नेटवर्किंग कंपन्यांकडून मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता पुर्ववत करण्याचे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत आहे. (उदा. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., वोडाफोन सेल्युलर लि., भारती एअरटेल इत्यादी नेटवर्किंग कंपन्या).

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी पत्र क्र.उ.अ./IFMNS/A56045/2018 दि.१२/२/२०१८ अन्वये “सदर रस्ते म औ वि महामंडळाचे मालकीचे असून रस्ते दुरूस्ती व देखभालीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांरीत करण्यात आलेले आहेत. तरी मऔविम, क्षेत्रामधील जून्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रस्ते खोदकाम शुल्क परिगणित करताना मनपा अधिभार लावू नये,” अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेकडे औद्योगिक क्षेत्रातील रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत केलेले आहे. सदर रस्त्यांची जागा मालकी ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची असल्याने सदर ठिकाणी त्याच संस्थेच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता दुरूस्ती शुल्क घेऊन तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना त्यांच्या जागा मालकी व्यतिरीक्त महापालिका कार्यक्षेत्रात भूमिगत सेवावहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार व रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून सदर संस्थेस रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण निश्चित करणेसाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेकडे औद्योगिक क्षेत्रातील रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत केलेल्या जागेत त्याच संस्थेच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून, तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना त्यांच्या जागा मालकी व्यतिरीक्त महापालिका कार्यक्षेत्रात भूमिगत सेवावहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार व रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून सदर संस्थेस रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरणात्मक निर्णयाकामी मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दसरी

दाखल करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

विषय क्रमांक ०१ दसरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४६ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य अ क्षेत्रिय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.अक्षेका/स्था/कावि/५७७/२०१८ दि.१५/०५/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील जुना जी बी हॉलवर स्लॅब टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामासाठी (Architect) व (PMC) ची नेमणुक करणेबाबत...

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४७ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार (वैद्यकिय)

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/१२४/२०१८ दि.१६/०५/२०१८

विषय - वाय.सी.एम.एच. येथे रूग्णाना हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देणेकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४८ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – ह क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.वि/हक्षे/वायसीएमएच/१२५/२०१८ दि.२१/५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

१ जुन २०१८ ते ३१ मे २०२१ (३ वर्ष) ह्या कालावधिकरीता वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील UPS Sysyem (4 UPS) ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे चे कामकाज मे. पॉवर व्हिजन इन्फो

सर्व्हिसेस प्रा.लि. ह्या उत्पादक कंपनीकडून थेट पद्धतीने करारनामा करून करवून घेणेस व त्या कामी प्रतिवर्षि (र.रू. ३,९९,२००/- + टॅक्सेस = ४,७१,०५६/-) (अक्षरी र.रू. चार लाख एक्काहत्तर हजार छपन्न फक्त) त्यांस आगावू अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४९ विषय क्रमांक - ०५

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/१४७/२०१८ दि.०३/०५/२०१८

२) मा.सहाय्यक आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/१६९/२०१८, दि.०२/०६/२०१८

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये मा.सहाय्यक आयुक्त, क्रीडा यांनी विषय क्रमांक ०५ चे विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषयपत्र मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५० विषय क्रमांक - ०६

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – YCMH ह क्षेत्रिय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.वि/हक्षे/वायसिएमएच/१२४/२०१८ दि.२१/५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२१ (३ वर्ष) ह्या कालावधिकरीता वाय.सी.एम. हॉस्पिटल. येथील चार टॉवर लिफ्ट्सचे वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे चे कामकाज मे.ओटीस इलेव्हेटर कं.(इं) लि. ह्या उत्पादक कंपनीकडून थेट पद्धतीने करारनामा करून करवून घेणेस व त्या कामी प्रतिवर्षि (र.रू.८,००,०००/- + टॅक्सेस) त्यांस आगावू अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५१ विषय क्रमांक - ०७

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – औ.प्र.संस्था (मुलींची)

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रसंमु/०१/कावि/११०/२०१८ दि.२४/०५/२०१८

विषय - औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी येथे एकत्रित मानधनावर निदेशक फेरनियुक्तीबाबत...

विषय क्रमांक ०७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५२ विषय क्रमांक - ०८
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/अ-मुख्य/७४४/२०१८ दि.२४/५/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.89/2/2017-18 प्रभाग क्र. ४१ भाटनगर येथे भाजी मंडई परिसरात कॉंक्रीटीकरण करणेकामी M/s.MOTWANI AND SONS नि.र.रू.41,81,939/- (अक्षरी र.रू.एक्केचाळीस लाख ऐक्याऐंशी हजार नऊशे एकोणचाळीस फक्त) पेक्षा 22.57% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.32,38,075/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसारत्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५३ विषय क्रमांक - ०९
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/अ-मुख्य/७४५/२०१८ दि.२८/५/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.46/1/2017-18 प्रभाग क्र.२५ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.MOTWANI AND SONS नि.र.रू.46,21,572/- (अक्षरी र.रू.शेचाळीस लाख एकवीस हजार पाचशे बाहत्तर फक्त) पेक्षा 11.30**%** कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.40,99,334**/-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५४ विषय क्रमांक - १०
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/१०१/२०१८ दि. २५/५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१४/०५/२०१८ ते दि.२०/०५/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१०१/२०१८ दि.२५/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा

अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५५ विषय क्रमांक - ११

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/१००/२०१८ दि.२५/५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०७/०५/२०१८ ते दि.१३/०५/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१००/२०१८ दि.२५/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५६ विषय क्रमांक - १२

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जा.क्र.फक्षेका/नि-४/कावि/२९०/२०१८, दि.२५/०५/२०१८

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कांमाच्या सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ५) नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५७ विषय क्रमांक - १३

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६५०/२०१८ दि.३१/५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - २७५८ विषय क्रमांक - १४
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – जलनि:सारण विभाग
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०४८/२०१८ दि.३१/५/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलनि:सारण विभागाकडील २५ लाखा पर्यंतचे निविदेचे सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मधील विकास कामांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ ड नुसार प्राप्त अधिकारात निविदा प्रक्रिया पुर्ण करुन, कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७५९ विषय क्रमांक - १५
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/क-मुख्य/११७/२०१८ दि.१/६/२०१८

विषय - प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर मध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये म्युरल्स बसविणे व सुशोभिकरणाची कामे करणे.

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६० विषय क्रमांक - १६
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.स्था/FHO/कावि/२९५/२०१८ दि.३१/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य मुख्यालयामार्फत पिपंरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणारे इमारत बांधकाम, लॅंडस्केपींग, इंटरिअर डिझायनिंग व इतर विकास प्रकल्पाच्या कामा करिता नि.नो.क्र.२४/१/२०१७-१८ अन्वये Expression of Interest ची निविदा प्रसिध्द करणेत आली होती, त्यास अनुसरुन टप्पा - १ मध्ये एकूण ३७ इच्छुक सल्लागारांना सहभागी करुन घेणेत आलेले आहे. टप्पा - २ मध्ये उर्वरित पैकी १० व नावांमधील त्रुटी दुरुस्तीकरीता ३ असे एकूण १३ वास्तुविशारद यांचे कामाचे वर्गवारी प्रमाणे १ ते ४ क्षेणीमध्ये प्रपत्र-अ (इमारत बांधकाम विषयक कामे - ११ वास्तुविषारद), प्रपत्र-ब (लॅंडस्केपींग विषयक कामे - ०४ वास्तुविषारद) व प्रपत्र - क (इंटेरिअर

डिझायनिंग विषयक कामे - ०७ वास्तुविषारद) याप्रमाणे प्रपत्र - अ, ब व क तयार करणेत आले आहे. टप्पा - २ मधील प्रपत्र-अ, ब व क प्रमाणे एकूण १३ वास्तुविषारद यांना पॅनेलवर घेणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६१ विषय क्रमांक - १७

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/२६७/२०१८ दि.२८/५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये केंद्र शासनाचे धोरणानुसार CSR Activity राबविणेसाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली दिं.१८/११/२०१६ रोजी घेणेत आलेल्या सभेमध्ये CSR Expert सल्लागार मानधनावर नेमणेकामी निर्णय झाला आहे. तसेच सदर CSR Expert सल्लागार नेमणेकामी र.रु.७०,०००/- प्रति महा इतके मानधन निश्चित करणेकामी प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदर CSR Expert सल्लागार नेमणे करिता MBA CSR पदवीका प्राप्त अथवा MBA शिक्षणपुर्ण, CSR विषयक अनुभवासह अशी शैक्षणिक अर्हता ठरविणेत आलेली होती. या पुर्वी सी.एस.आर. कक्षाकडून जाहीरात मागवून सी.एस.आर. सल्लागार यांची एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधी करिता नेमणूक करणेत आली होती. त्याची मुदत दिं.३१ मे २०१८ रोजी पुर्ण होत असल्यामुळे, या कामकाजाकरिता नव्याने सल्लागार मानधनावर नेमणेकामी दि. २७ एप्रिल २०१८ रोजी जाहीरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करणेत येऊन, त्यानुसार वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देऊन इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त अर्जांपैकी ज्यांनी CSR विषयक कामाचा अनुभव असल्याचे त्यांचे माहिती पत्रामध्ये नमुद केले आहे अशा एकूण १४ उमेदवारांची अतिरिक्त आयुक्त यांचे मार्फत दि.२१ मे २०१८ रोजी मुलाखत घेणेत आलेली आहे. सदर अंतिम मुलाखतीचे अनुषंगाने श्री. विजय वावरे, एम.ए. सामाजिक शास्त्र यांना CSR Expert सल्लागार म्हणून र.रु.७०,०००/- (अक्षरी र.रू.सत्तर हजार फक्त) प्रति महा एकत्रित मानधनावर नियुक्ती दिनांकापासुन पुढील ६ महिने कालावधीकरीता नेमणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६२ विषय क्रमांक - १८

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – पाणीपुरवठा विभाग

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/१३६७/२०१८ दि.२९/५/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २६) मधील निविदा

कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६३ विषय क्रमांक - १९

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/४/कावि/४०८/२०१८, दि.०१/०६/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे वायसीएम रुग्णालयाकडील विविध वार्डकरीता आवश्यक खुर्च्याची तातडीची मागणी विचारात घेता यापुर्वीचे ई निविदा सुचना क्र.46/2017-18 चे आदेशानुसार मे. रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांचेकडुन 75 नगासाठी प्रती नग र.रु.7,749/- प्रमाणे एकुण र.रु.5,81,175/- (अक्षरी र.रु.पाच लाख एक्याऐंशी हजार एकशे पंच्याहत्तर फक्त) चे खर्चास पुनर्प्रत्ययी आदेश देणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २७६४ विषय क्रमांक - २०

दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग - उद्यान

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/२७६/२०१८, दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१८-१९ मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी वृक्षारोपणाची मोठी रोपे पुरविणे व लागवड करुन १ वर्षे देखभाल करणेकामी मे.न्यु गार्डन गुरुज फार्म अन्ड नर्सरी यांची निविदा र.रु.१,३६,९०,१६२/- (अक्षरी र.रु.एक कोटी, छत्तीस लाख, नव्वद हजार, एकशे बासष्ट फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.५०% ने कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्या प्रमाणे येणारा खर्च र.रु.१,३२,११,००६/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे व त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६५ विषय क्रमांक - २१
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग - उद्यान
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/२७५/२०१८, दि.०५/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/२०१८-१९ मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी २ मीटर उंचीची वृक्षारोपणाची रोपे खरेदी करणेकामी मे.न्यु गार्डन गुरुज फार्म अन्ड नर्सरी यांची निविदा र.रु.३२,५०,०००/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख, पन्नास हजार फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३०% ने कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्या प्रमाणे येणारा खर्च र.रु.३१,४२,७५०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे व त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६६ विषय क्रमांक - २२
दिनांक – ०६/०६/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/कावि/३६३/२०१८, दि.०४/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे स्थापत्य विभागाकडील निविदा नोटीस क्र.११२/४/२०१७-१८ अन्वये ब प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रु. ४,१७,३०,५४८/- (अक्षरी र.रु.चार कोटी, सतरा लाख, तीस हजार, पाचशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा १३.५५% कमी र.रु.३,६०,७६,०५९/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६७ विषय क्रमांक - २३
दिनांक – ०६/०६/२०१८
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील महत्वाची प्रेक्षनीय स्थळे, ऐतिहासिक वास्तू, आयटी सेक्टर, ठिकाणी पुणे मनपाच्या पुणे दर्शन बस सेवेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड मनपाकरीता पिंपरी चिंचवड दर्शन बससेवा (बीआरटीसाठी) सुरु करण्याचे महामंडळाचे नियोजन आहे. तरी ९०० एमएम फ्लोअर

हाईटच्या १० बस नामांकीत कंपनीच्या, ऑटोमेटीक ट्रान्समिशन असणा-या बीआरटी वातानुकुलित बसेस खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७६८ विषय क्रमांक - २४

दिनांक – ०६/०६/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मधील नविन जलनि:सारण जोडणी व पुर्णत्वाचा दाखला मिळणेसाठी तसेच पुनर जोडणी (रि कनेक्शन) या कामासाठी सर्व सामान्य नागरिकांना संपुर्ण माहिती व्हावी यासाठी (अनामत रक्कम, अर्जासोबत जोडावी लागणारी कागदपत्रांची यादी, रस्ता खोदाई रक्कम, प्लंबर कडील नकाशा, तसेच पुनर जोडणी रक्कम, क्षेत्रीय कार्यालयांतर्गतची अधिकृत प्लंबरची यादी, सदर कामासाठी लागणारा कालावधी) इ. अशा प्रकारची समाविष्ट असलेली तपशिलवार माहितीचे सुचना फलक सर्व ८ ही क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी सहज दिसेल असे दर्शनी भागामध्ये त्वरित लावण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७७१ विषय क्रमांक - २५

दिनांक – ०६/०६/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मधील नळजोड तसेच पुनर जोडणी (रि कनेक्शन) या कामासाठी सर्व सामान्य नागरिकांना संपुर्ण माहिती व्हावी यासाठी ( व्यासाचे आकारानुसार अनामत रक्कम दर, अर्जासोबत जोडावी लागणारी कागदपत्रांची यादी, नविन मिटर साठी भरावयाची रक्कम, रस्ता खोदाई रक्कम, तसेच एकूण भरावयाची रक्कम, तसेच मिटरला मान्यता दिलेल्या कंपनीची नावे, सदर कामासाठी लागणारा कालावधी) इ. बाबत तपशिलवार माहितीचे सुचना फलक सर्व ८ ही क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी सहज दिसेल असे दर्शनी भागामध्ये त्वरित लावण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७७० विषय क्रमांक - २६

दिनांक – ०६/०६/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील चोविसावाडी शाळा क्र.२० व यशवंतनगर शाळा या ठिकाणी शाळा मधील अंतर तीन किलोमीटर आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी बस वाहतुकीची व्यवस्था मागील वर्षाप्रमाणे र.रु.११.५० प्रति विद्यार्थी या दराने सन २०१८-१९ व २०१९-२० करीता अंदाजे ३५० विद्यार्थी वाहतुक करणेकामी मे.प्रेम टुर्स ऍन्ड ट्रॅव्हल्र्स यांना थेट पध्दतीने काम देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.१२,००,०००/- (अक्षरी र.रु.बारा लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/७५८/२०१८
दिनांक - ०७/०६/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.फक्षेका/नि-४/कावि/२९०/२०१८ दि.२५/५/२०१८ विषय क्र.१२ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44
(विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/ 290/2018 दि.25/05/2018 लगत)
प्रपत्र "अ"

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.श्रीगणेश बाळकृष्ण पोरे | 5/1/2017-18 | प्रभाग क्र २ त्रिवेणीनगर येथील नाला दुरूस्त करणे | 4/05/2018 | फक्षेका/नि-4/कावि/283/2018 | 23/05/2018 | 924215 | -39.99% कमी | 554621 |
| 2 | मे.डी पी बाबर | 5/3/2017-18 | प्रभाग क्र १ रूपीनगर कॉलनी मधील रस्त्यावर थर्मोप्लास्ट पेंटने रोड मार्कींग करणे | 4/05/2018 | फक्षेका/नि-4/कावि/284/2018 | 23/05/2018 | 923313 | -39.99% कमी | 554080 |
| 3 | मे.डी पी बाबर | 5/4/2017-18 | प्रभाग क्र १ रूपीनगर तळवडे मधील रस्त्यांना झालेले क्रॉसकट ट्रेंचेस कोल्समिक्स पद्धतीने बुजविणे | 4/05/2018 | फक्षेका/नि-4/कावि/285/2018 | 23/05/2018 | 924322 | -39.99% कमी | 554686 |
| 4 | मे.श्रीगणेश बाळकृष्ण पोरे | 5/5/2017-18 | प्रभाग क्र 2 त्रिवेणीनगर मधील म्हेत्रेवाडी मधील विविध सोसायट्यांमध्ये मधील ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक दुरूस्ती करणे | 4/05/2018 | फक्षेका/नि-4/कावि/286/2018 | 23/05/2018 | 924368 | -39.99% कमी | 554713 |
| 5 | मे.श्रीगणेश बाळकृष्ण पोरे | 5/9/2017-18 | प्रभाग क्र २ त्रिवेणीनगर येथे ठिकठिकाणी खुर्च्या व दिशादर्शक फलक बसविणे | 4/05/2018 | फक्षेका/नि-4/कावि/287/2018 | 23/05/2018 | 924280 | -39.99% कमी | 554660 |
| | | | | | | | 4620498/- | | 2772760/- |

क्षेत्रिय अधिकारी
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(10)

D:\TENDER 2017-18\01Tender 2017-18\Nagarsachiv Docet - CIVIL.doc 3

(क्र.जनि/२/कावि/१०४८/२०१८ दि.३१/५/२०१८ विषय क्र.१४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
जलनिसारण विभाग
पत्र क्र जनि/२/कावि/१०४८/18
दिनांक ३१ / 5 /2018

## प्रपत्र - अ (पान क्र. १ )

जलनिसारण विभाग

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर (कमी) | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s Sumit Construction | 15/24/2017-18 | कासारवाडी मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत सदगुरूनगर येथील श्री स्वामी समर्थ कॉलनी येथे मलनि:सारण नलिका टाकणे. | 21-03-2018 | जनि/२/कावि/१०२५/१८ | 17-05-2018 | 14,99,836 | 15.90 | 12,61,362 |
| 2 | M/s D D CONSTRUCTION | 21/11/2017-18 | चऱ्होली मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत चोविसावाडी, वडमुखवाडी , काळजेवस्ती इत्यादी भागात मलनि:सारण नलिका टाकणे. | 21-03-2018 | जनि/२/कावि/१००५/१८ | 18-04-2018 | 11,99,971 | 23.27 | 9,20,738 |
| 3 | M/s D D CONSTRUCTION | 21/17/2017-18 | चऱ्होली मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत बुर्डेवस्ती, माळीपेठा इत्यादी भागात मलनि:सारण नलिका टाकणे. | 21-03-2018 | जनि/२/कावि/१००४/१८ | 18-04-2018 | 10,49,751 | 23.27 | 8,05,474 |
| 4 | M/s Jay Construction | 21/4/2017-18 | चऱ्होली मैलाशुद्धीकरण केंद्रांतर्गत चऱ्होली येथे दाभाडेवस्ती , कोतवालवाडी इत्यादी परिसरात मलनि:सारण नलिका टाकणे. | 18-04-2018 | जनि/२/कावि/१०२८/१८ | 19-05-2018 | 11,99,784 | 22.33 | 9,31,872 |
| 5 | M/s Jay Construction | 15/9/2017-18 | च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत मोशी येथे डुडूळगाव परिसरात मलनि:सारण नलिका टाकणे. | 18-04-2018 | जनि/२/कावि/१०२९/१८ | 19-05-2018 | 10,49,988 | 18.12 | 8,59,730 |
| | | | | | | एकुण | ५९,९९,३३०/- | | ४७,७९,१७६/- |

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

(क्र.पापु/६/कावि/१३६७/२०१८ दि.२९/५/२०१८ विषय क्र.१८ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पाणी पुरवठा विभाग
क्र.पापु/६/कावि/१३५७/२०१८
दि. ३०/०५/२०१८

प्रपत्र अ ( १ ते २६ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मे. मनिष असोसिएट्स | १७/३/२०१७-१८ | "अ" क्षेत्रिय कार्यालयांतर्गत अजंठानगर, दुर्गानगर आंबेडकर नगर इ.परिसरात पाईपलाईन टाकणे व गरजेनुसार देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०६/०२/२०१८ | पापु/६/कावि/१२०/२०१८ | १६/०२/२०१८ | २२,४०,८९०/- | १९.५० % कमी | १८,०३,९१६/- |
| २ | मे. छोटेलाल चौहान | १७/११/२०१७-१८ | सन २०१७-१८ करिता नवी सांगवी परिसरामध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०१/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३४८/२०१८ | १९/०५/२०१८ | १२,५५,७७०/- | १०.०० % कमी | ११,३०,१९३/- |
| ३ | मे. प्रसाद हनुमंत देवकाते | १७/३०/२०१७-१८ | सन २०१७-१८ करिता जुनि सांगवी परिसरामध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | २८/०२/२०१८ | पापु/६/कावि/१३४६/२०१८ | १७/०५/२०१८ | १२,५५,७७०/- | १०.०० % कमी | ११,३०,१९३/- |
| ४ | मे. एच. एम. कन्स्ट्रक्शन | ३१/३//२०१७-१८ | फ प्रभाग अंतर्गत त्रिवेणीनगर पाण्याची टाकी येथे स्थापत्य विषयक कामे करणे व रंगरंगोटी करणे. | ०९/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३४९/२०१८ | २१/०५/२०१८ | २२,४९,६६०/- | १२.७५ % कमी | १९,६२,८२८/- |
| ' | मे. मोरया एंटरप्रायझेस | २५/१५/२०१७-१८ | सन २०१७-१८ साठी प्रभाग क्र.४७ काळेवाडी, तापकीर नगर परिसरात आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा विषयक देखभाल दूरूस्तीची कामे करणे. | १४/०२/२०१८ | पापु/६/कावि/१०६७/२०१८ | १७/०२/२०१८ | २१,००,९०३/- | २३.३२ % कमी | १६,१०,९७२/- |
| ६ | मे. प्रियंका कन्स्ट्रक्शन | २५/२३/२०१७-१८ | जलक्षेत्र क्र.अ/७ दत्तवाडी, विठ्ठलवाडी परिसरात दैनंदिन किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०१/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३५६/२०१८ | २३/०५/२०१८ | १४,००,०८८/- | २६.१०% कमी | १०,३४,६६५/- |
| ७ | मे. युनिक ट्रेडर्स | २५/२२/२०१७-१८ | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत रूपीनगर येथे पाणीपुरवठा विषयक देखभाल दूरूस्तीची कामे करणे व पाईप लाईन टाकणे. | ०५/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३४५/२०१८ | १५/०५/२०१८ | १८,२०,५४५/- | २८.००% कमी | १३,१०,७९२/- |
| | | | | | | | 12323626/- | | 9983559/- |

४

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | मे. जय इंजिनिअर्स | २५/५/२०१७-१८ | दिघी बोपखेल व नव्याने विकसित होणा-या भागात पाणी पुरवठा जलवाहिनी पुरविणे व टाकणे.(सन २०१७-१८) | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१५/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,२२२/- | २०.००% कमी | ११,२०,१७७/- |
| ९ | मे. जय इंजिनिअर्स | २५/९/२०१७-१८ | अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत काळभोरनगर, मोहननगर, म.फुलेनगर येथे पाणीपुरवठा सुधारणेकामी नवीन पाईप लाईन टाकणे, व्हॉल्व्ह बसविणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१९/२०१८ | ०८/०५/२०१८ | २२,४०,८९०/- | २१.५० % कमी | १७,५९,०९८/- |
| १० | मे. जय इंजिनिअर्स | २५/१८/२०१७-१८ | ग प्रभागा अंतर्गत प्र. क्र. २२ ओटास्किम PCMC कॉलनी परिसरात आवश्यकतेनुसार पाईपलाईन टाकणे व किरकोळ दुरूस्तीची कामे करणे. | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१६/२०१८ | ०८/०५/२०१८ | १२,६०,४७८/- | २६.०० % कमी | ९,३२,७५३/- |
| ११ | मे. जय इंजिनिअर्स | २५/२७/२०१७-१८ | फ प्रभागाअंतर्गत निगडी गावठाण,लक्ष्मीनगर, साईनाथनगर भागात आवश्यकतेनुसार पाईपलाईन टाकणे व किरकोळ दुरूस्तीची कामे करणे. | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१८/२०१८ | ०८/०५/२०१८ | १२,६०,४७८/- | २६.४० % कमी | ९,२७,७११/- |
| १२ | मे. जय इंजिनिअर्स | २५/२८/२०१७-१८ | भोसरी गावठाण भागातील डोळसवस्ती इत्यादी परिसरात नविन डी.आय. पाईपलाईन टाकणे.(सन २०१७-१८) | ०७/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१४/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,१०८/- | २०.०० % कमी | ११,२०,०८६/- |
| १३ | मे. जय इंजिनिअर्स | २५/३२/२०१७-१८ | "अ" क्षेत्रिय कार्यालयांतर्गत इंदिरानगर, अण्णासाहेब मगर झोपडपट्टी, गवळीवाडा चिंचवड स्टेशन येथे पाणीपुरवठा सुधारणेकामी नवीन पाईप लाईन टाकणे, व्हॉल्व्ह बसविणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१७/२०१८ | ०८/०५/२०१८ | २१,७०,८४७/- | २१.०० % कमी | १७,१४,९६९/- |

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | मे.श्रावणी इंजिनिअर्स | २५/६/२०१७-१८ | जलक्षेत्र क्र.अ/७ तुळजाई वस्ती, विवेकनगर व दवा बाझार, आय.डी.बी.आय.बॅक परिसरात दैनंदिन किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०७/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१३/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,२२१/- | २६.४० % कमी | १०,३०,५६२/- |
| १५ | मे.श्रावणी इंजिनिअर्स | २५/२०/२०१७-१८ | अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत काळभोरनगर, मोहननगर चिंचवड स्टेशन भागात पाणीपुरवठा विषयक कामाची देखभाल दुरुस्ती करणे | ०७/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३११/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,५२४/- | २६.०० % कमी | १०,३६,३८७/- |
| १६ | मे.श्रावणी इंजिनिअर्स | २५/२९/२०१७-१८ | फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत यमुनानगर येथे पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | ०१/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१०/२०१८ | ०८/०५/२०१८ | १८,२०,६९०/- | २६.४० % कमी | १३,४०,०२७/- |
| १७ | मे.श्रावणी इंजिनिअर्स | २५/३३/२०१७-१८ | जलक्षेत्र क्र.अ/७ आकुर्डी गावठाण, पंचतारानगर परिसरात दैनंदिन किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०७/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३१२/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,११९/- | २६.४० % कमी | १०,३०,४८७/- |
| १८ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/१०/२०१७-१८ | प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भागातील भगतवस्ती गुळवेवस्ती इत्यादी परिसरात नविन डी.आय पाईप लाईन टाकणे.(सन २०१७-१८) | ०६/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२५/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,५१२/- | २०.०० % कमी | ११,२०,४०९/- |
| १ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/११/२०१७-१८ | प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भागातील परिसरात नविन डी.आय पाईप लाईन टाकणे.(सन २०१७-१८) | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२३/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,२५५/- | २०.०० % कमी | ११,२०,२०४/- |

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/१२/२०१७-१८ | प्रभाग क्र.३५ भोसरी गावठाण भागातील परिसरात नविन डी.आय .पाईपलाईन टाकणे.(सन २०१७-१८) | ०६/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२६/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,२४४/- | २०.०० % कमी | ११,२०,१९५/- |
| २१ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/१४/२०१७-१८ | हुतात्मा चौक महादेवनगर गुरुविहार कॉलनी से.क्र.१ भागात नविन डी.आय. लाईन | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२०/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,२९९/- | २०.०० % कमी | ११,२०,२३९/- |
| २२ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/१७/२०१७-१८ | चक्रपाणी वसाहत आळंदी रोड परिसरात नविन डि.आय लाईन टाकणे. | ०६/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२७/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,४७३/- | २०.०० % कमी | ११,२०,३७८/- |
| २३ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/२४/२०१७-१८ | अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत दत्तवाडी,विठ्ठल वाडी परिसरात पाईप लाईन टाकणे व गरजेनुसार देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०६/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२२/२०१८ | ०८/०५/२०१८ | २१,७०,८०१/- | २५.४० % कमी | १६,१९,४१७/- |
| २४ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/२५/२०१७-१८ | प्रभाग क्र. २९ इंद्रायणीनगर या भागातील विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार नविन डी.आय. पाईप लाईन टाकणे (२०१७-२०१८) | ०६/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२८/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,५०२/- | २६.४० % कमी | १०,३०,७६९/- |
| २५ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/२६/२०१७-१८ | अ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत विवेक नगर , तुळजाईवस्ती परिसरात पाईप लाईन टाकणे व गरजेनुसार देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०८/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२१/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,५४५/- | २६.४० % कमी | १०,३०,८०१/- |
| २६ | मे.बालाजी इंजिनिअर्स | २५/३०/२०१७-१८ | सद्गुगुरुनगर रामनगर फुलेनगर हुतात्मा चौक परिसरात नविन डि. आय. लाईन टाकणे(२०१७-२०१८) | ०६/०३/२०१८ | पापु/६/कावि/१३२४/२०१८ | ०८/०५/२०१८ | १४,००,५०२/- | २०.०० % कमी | ११,२०,४०१/- |

एकुण रु. ~~१०५४५३३५६/-~~ ५,१४,५२,३३६/- ३,२३,८८,६२९/-

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८